दिनांक 09/11/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्रं.169

विषय - वैशिष्ट्यपूर्ण योजनेतील विकास कामांना मुदतवाढ मिळणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ - 1) मा.मुख्याधिकारी यांनी इंजिनियर यांची दिनांक 07/11/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) मा. जिल्हाधिकारीसो, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडील प्रशासकीय मान्यता क्र.नवि/कार्या- 02/कावि-157/ एसआर-263/2021 दि. 26/03/2021

3) मा. जिल्हाधिकारीसो, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडील प्रशासकीय मान्यता क्र.नवि/कार्या- 02/कावि- 25/ एसआर-15/2022 दि. 01/02/2022

4) शासन निर्णय क्र. संकिर्ण - 10.21/प्र.क्र.63/ अर्थोपाय दि. 16/10/2023

संदर्भ क्र. 02 अन्वये सन 2017-18 करीता वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत मंजूर निधीतून मा. जिल्हाधिकारीसो, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडून खालील 7 कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली ती कामे खालीलप्रमाणे.

1. विटा नगरपरिषद हद्दीतील व्हिजन सिटी येथील जुना सर्व्हे नं. 461 जागेत सुशोभिकरण करणे.
2. विटा नगरपरिषद हद्दीतील व्हिजन सिटी येथील जुना सर्व्हे नं. 461/2 जागेत सुशोभिकरण करणे. (नविन सर्व्हे नं. 75/3/5)
3. विटा नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नं. 16, 19 यासीन हानीफ मुल्ला येथील जागेत सुशोभिकरण करणे. (नविन सर्व्हे नं. 16, 19)
4. विटा नगरपरिषद हद्दीतील गट नं. 403 येथील जागेत सुशोभिकरण करणे. (नविन सर्व्हे नं.19/1)
5. विटा नगरपरिषद हद्दीतील खंबाळे रोड ते सांगली रोड नविन 24 मी. रुंदीच्या रस्त्यालगतच्या जागेत सुशोभिकरण करणे.
6. विटा नगरपरिषद हद्दीतील स.नं. 1040 जोगड़ प्लॉट येथील मोकळया जागेत सुशोभिकरण करणे.
7. विटा नगरपरिषद हद्दीतील चिरवळ ओढयाजवळील मोकळया जागेत सुशोभिकरण करणे.

सदर निधी दि.31/03/2023 पर्यंत खर्च करणे आवश्यक होते. परंतू कामे अपूर्ण असल्यामुळे सदर निधी पूर्ण खर्च करता आला नाही.

पान नं.2 वर

संदर्भ क्र. 03 अन्वये सन 2016-17 करीता वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत मंजूर निधीतून मा. जिल्हाधिकारीसो, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडून खालील 7 कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली ती कामे खालीलप्रमाणे.

1. विटा नगरपरिषद हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक तासगाव नाक्यापर्यंत रस्ता चौक सुशोभीकरण करणे
2. विटा नगरपरिषद हदीतील साळशिंगे रोड मशिद ते वन विभाग कार्यालय पर्यंत रस्ता पॉंक सुशोभीकरण करणे
3. विटा नगरपरिषद हद्दीतील उभी पेठ रस्ता येथील दगडी पाण्याची टाकी ते हाजी हाफीज कमानपर्यंत रस्ता चौक सुशोभीकरण करणे
4. विटा नगरपरिषद हद्दीतील भाजी मंडई ते शिवप्रताप गोल्ड टॉवर, दगडी पाण्याची टाकी ते सराफ पेठ मंगल वस्त्रम ते सेंट्रल हायस्कूल रस्ता पर्यंत चौक सुशोभीकरण करणे
5. विटा नगरपरिषद हद्दीतील मायणी रोड वरील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते हॉटेल ग्रीन पार्क रस्ता चौक सुशोभीकरण करणे
6. विटा नगरपरिषद हद्दीतील साळशिंगे रोड वरील मधुबन हॉटेल ते यशवंतराव चव्हाण पुतळा ते चौडेश्वरी मंदिर पर्यंत रस्ता चौक सुशोभीकरण करणे
7. विटा नगरपरिषद हद्दीतील विटा नगरपरिषदे समोरील रस्ता, गिड्डे पर ते शाळा नं.02 बैंक ऑफ इंडिया समोरील रस्ता व छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पंचमुखी गणपती मंदिर ते विटा नगरपरिषद इमारत रस्ता चौक सुशोभीकरण करणे.

सदर निधी दि.31/03/2023 पर्यंत खर्च करणे आवश्यक होते. परंतू कामे अपूर्ण असल्यामुळे सदर निधी पूर्ण खर्च करता आला नाही.

संदर्भ क्र. 04 च्या शासन निर्णयान्वये नगरपरिषदांना दि.31/03/2023 पूर्वी वितरीत केलेला व दि.31/03/2023 पर्यंत अखर्चित असलेला निधी दि.28/02/2024 पर्यंत खर्च करणेकरीता वित्त विभागाने परवानगी दिलेली आहे. तरी सदर कामे पूर्ण करणेकरीता सदर कामांना दि. 31/01/2024 पर्यंत मुदतवाढ देणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 09/11/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्रं.170

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील माळी प्लॉट ते शांतीश्री बिल्डींग पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी नगर अभियंता यांची दिनांक 08/11/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद हद्दीतील माळी प्लॉट ते शांतीश्री बिल्डींग पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) गजानन रामचंद्र निकम अंदाजपत्रकीय दरापेक्षा - 5.00% कमी दराने
2) सुहेल सलिम तांबोळी अंदाजपत्रकीय दराने
3) रोहित राजकुमार सुर्यवंशी अंदाजपत्रकीय दरापेक्षा - 2.00% कमी दराने

उपरोक्त ई निविदापैकी गजानन रामचंद्र निकम यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा